महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **दि.१८-०६-२०२४**

**परिपत्रक क्र. १८४**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प निदेशक-१४५७ पदे भरण्याकरिता दिनांक १७/०८/२०२२ रोजी जाहिरात क्र.१/२०२२ प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने काही उमेदवारांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे O.A.No.११२०/२०२३ अन्वये याचिका दाखल केली होती. मा.न्यायाधिकरणाने दि.१०/०५/२०२४ रोजीच्या न्याय निर्णयान्वये शासनाच्या बाजूने निर्णय देऊन याचिकाकर्त्यांना वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याकरिता ०४ आठवड्यांची मुदत देऊन याचिका निकाली काढली. सदर न्याय निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे W.P.No.५२७१/२०२४ अन्वये याचिका दाखल झाली आहे. सदर प्रकरणी संचालनालयाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात यापूर्वीच Caveat दाखल करण्यात आले होते.

सदर याचिकेच्या अनुषंगाने संचालनालयाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच शासनाची बाजू भक्कमपणे मांडण्याकरिता Special Counsel ची देखील नेमणूक करण्यात आली आहे.

तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

Anil Gotiram Gavit

Digitally signed by Anil Gotiram Gavit
DN: CN = Anil Gotiram Gavit, C = IN, S = Maharashtra, O = DIRECTOR OF VOCATIONAL EDUCATION AND TRAINING MS, OU = DIRECTOR OF VOCATIONAL EDUCATION AND TRAINING
Reason: I am approving this document
Date: 2024.06.18 13:12:12 +05'30'

(अ. गो. गावीत)
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.